महाराष्ट्र शासन


उद्योग संचालनालय


जिल्हा उद्योग केंद्र,भंडारा
नागपूर विभाग

# 100 दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम

# संकेतस्थळ


- उद्योग विभागाने नवीन संकेतस्थळ विकसित करण्यात आले असून प्रत्यक्ष कार्यान्वित झालेले आहे.
- राज्यपातळीवरील संकेतस्थळ वापरण्यास सुलभ (user friendly) आहे.
- संकेतस्थळावर माहितीचे अद्ययावतीकरण (updated information) करण्यात आलेले आहे.
- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 4 फेब्रुवारी 2025 रोजी सुरू केलेले महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा कक्ष (मैत्री) 2.0 पोर्टल आता पूर्णपणे कार्यरत आहे. पोर्टल 15 विभागांमधील 119 सेवा एकाच डिजिटल प्लॅटफॉर्ममध्ये एकत्रित करते, प्रशासकीय अडथळे कमी करून आणि रिअल-टाइम अर्ज ट्रॅकिंग सक्षम करून गुंतवणूक प्रक्रिया सुलभ करते. मैत्री 1.0 पोर्टलवर नवीन नोंदणी आता कार्यरत नसल्याने, गुंतवणूकदारांना मैत्री 2.0 द्वारे https://maitri.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करण्याची सुविधा देण्यात येत आहे. या संदर्भात विविध माध्यम जसे कि कार्यशाळा / मेळावे/ परिषदा इ. मधून उद्योजक व औद्योगिक संघटना / संस्था यांना माहिती देण्यात येते.
- माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत ( RTI ) माहितीचे स्वयंप्रकटीकरण( Proactive disclosure ) करण्यात आलेले आहे.
- लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत (RTS) अधिसूचित ऑनलाईन सेवांचा तपशील संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे.




# MAITRI Cell

# DI website



# कार्यालयः- महाव्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद्र,भंडारा

माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत


इमेल:- didic.bhandara@gmail.com

दूरध्वनी:-07184-251582

जिल्हा उद्योग केंद्र,भंडारा

| अ.क्र. | अधिका-याचे नाव | पदनाम | माहिती आधिकारांतर्गत पद |
|---|---|---|---|
| १ | श्री.हेमंत केशव बदर | महाव्यवस्थापक | अपिलीय अधिकारी |
| २ | श्री.धनंजय परसराम शिंगटे | व्यवस्थापक | जनमाहिती अधिकारी |

माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहितीचे स्वयंप्रकटीकरण



कार्यालय : महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, भंडारा

# महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम - 2015

| अ. क्र. | कार्यालयीन सेवा | सर्व कागदपत्रे जमा केल्यानंतर कालमर्यादा (दिवस) | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितिय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३/२०१९ अंतर्गत मुद्रांक शुल्क माफी प्रमाणपत्र | ०७ | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, भंडारा | मा. उद्योग सहसंचालक नागपूर विभाग, नागपूर | मा. अतिरिक्त उद्योग संचालक, उद्योग संचालनालय, मुंबई ३२ |
| ०२ | सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३/२०१९ अंतर्गत पात्रता प्रमाणपत्र | ३० | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, भंडारा | मा. उद्योग सहसंचालक नागपूर विभाग, नागपूर | मा. अतिरिक्त उद्योग संचालक, उद्योग संचालनालय, मुंबई ३२ |
| ०३ | सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३/२०१९ अंतर्गत औद्योगिक प्रोत्साहन अनुदान दावे | १५ | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, भंडारा | मा. उद्योग सहसंचालक नागपूर विभाग, नागपूर | मा. अतिरिक्त उद्योग संचालक, उद्योग संचालनालय, मुंबई ३२ |

तृतीय व अंतिम अपील मा. राज्य सेवा हक्क आयुक्त नागपुर यांच्याकडे करता येईल.


ई-मेल - crtsnagpur@maharastra.gov.in

वेबसाईट - https://aaplesarkar.mahaonline.gov.in

लोकसेवा हक्क अधिनियम

# सुकर जीवनमान

- भारत सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय अंतर्गत,'उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग' (DPIIT) ने स्थानिक उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि ग्रामीण भागांना त्यांच्या पारंपारिक कौशल्यांचा वापर करून सक्षम करण्यासाठी 'एक जिल्हा एक उत्पादन' (ODOP) उपक्रम सुरू केला. भंडारा One District One Product प्रोत्साहन उपक्रमांचा सक्रियपणे पाठपुरावा करत आहे. या उपक्रमांतर्गत, भंडारा जिल्ह्यासाठी ओळखण्यात आलेली ODOP उत्पादने तांदूळ आणि खनिजे आहेत. वैनगंगा नदीच्या काठावर वसलेला भंडारा जिल्हा भाताच्या मोठ्या उत्पादनामुळे संपूर्ण महाराष्ट्र भर ओळखला जातो. चिन्नोर, दुभराज आणि कालिकम्मोड यांसारख्या सुगंध असलेल्या तांदळाच्या वाणांना देशभरात जास्त मागणी आहे. ODOP क्षेत्रातील समस्यांचे निर्मूलन करण्याकरिता स्वतंत्र ODOP कक्ष निर्माण करण्यात आला आहे.
- मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम सहायता कक्ष अंतर्गत इच्छुक व जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयाशी प्रत्यक्ष संपर्क साधणा-या अर्जदारांना ऑनलाईन अर्ज जिल्हा उद्योग केंद्रामार्फत नि:शुल्क भरुन देण्याची सुविधा प्राप्त करुन देण्यात येते. मागील आर्थिक वर्षात या उपक्रमाअंतर्गत जवळपास पाचशे अर्ज भरून देण्यात आले होते.









ODOP कक्ष

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम सहायता कक्ष

# स्वच्छता


- शासन परिपत्रकानुसार कार्यालयातील अभिलेखांचे वर्गीकरण करण्यात आलेले आहे.
- जड वस्तू संग्रह नोंदवही अद्ययावतीकरण करण्यात आलेले आहे.
- जिल्हा उद्योग केंद्र  भंडारा यांच्या  जुन्या वाहनांचे निर्लेखन ०७.११.१९९७ करण्यात आलेले आहे.






अभिलेखांचे वर्गीकरण

जड वस्तू संग्रह नोंदवही



क्र. शातंनि/निवाह/हस्तांतरण/९७/ ४२५६
प्राचार्य यांचे कार्यालय,
शासकीय तंत्र निकेतन, साकोली.
दिनांक :- ६/११/९७

प्रति,

महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र,
भंडारा.

विषय :- निर्लेखित वाहन क्र. एम. टी. ई. ४६४९ च्या हस्तांतरणाबाबत.
संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्र. शातंनि/निवह/बैठक/९७/४०६९, दि. १८. १०. ९७

....

वरील संदर्भांकित पत्रानुसार आपणांस कळविण्यांत आलेले आहे की, आपल्या कार्यालयातील निर्लेखित वाहन क्र. एम. टी. ई. ४६४९ या संस्थेला हस्तांतरणाठी मान्यता देण्यांत आलेली आहे. सदर वाहन ताब्यात घेण्यासाठी या संस्थेतील श्री. ए. बी. अंधारे, अधि. यंत्र अभियांत्रिकी हे दिनांक ७. ११. ९७ रोजी आपल्या कार्यालयात येत आहे. त्यांना सदर वाहनाचा ताबा देण्यांत यावा. त्यांच्या सहीचा नमुना सोबत देत आहे.

Andhare
स्वाक्षरी.
[श्री. ए. बी. अंधारे]
अधि. यंत्र अभि.

साक्षांकित

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन साकोली

प्राचार्य,
शासकीय तंत्र निकेतन, साकोली.

प्रत :- १] सहसंचालक, तंत्र शिक्षण, प्रादेशिक कार्यालय नागपूर
२] उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, नागपूर.
३] श्री. ए. बी. अंधारे, अधि. यंत्र अभि. यांना माहिती करीता. त्यांनी दिनांक ७. ११. ९७ रोजी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, भंडारा यांचे कडुन सदर वाहनाचा ताबा घ्यावा.


---ooo---


# जुन्या वाहनांचे निर्लेखन

# तक्रार निवारण

आपले सरकार व पी जी पोर्टलवर प्राप्त झालेल्या तक्रारीवर प्राधान्याने कार्यवाही करण्यात येऊन प्रकरणे निकाली काढली जातात.

- आपले सरकार पोर्टलवर दिनांक 17 एप्रिल 2025 पर्यंत प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींचे निराकरण करण्यात आले असून , त्यामुळे सद्य:स्थितीत एकही तक्रार प्रलंबित नाही.
- पी जी पोर्टलवर दिनांक 17 एप्रिल 2025 पर्यन्त एकही तक्रार प्रलंबित नाही.
- मागील तीन वर्षात जिल्हा उद्योग केंद्र भंडारा यांची लोकशाही दिन मध्ये एकही तक्रार नाही .




Aaple Sarkar

PG Portal

# कार्यालयीन सोई सुविधा

कार्यालयामध्ये स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

. कर्मचारी व अभ्यागत यांच्यासाठी स्वच्छ प्रसाधनगृहाची सामायिक सुविधा आहे.






- अभ्यागतांसाठी भेटीचे नियोजन व भेटीच्या वेळाबाबत फलकाद्वारे प्रसिद्धी देण्यात आलेली आहे.



- अभ्यागतांसाठी स्वतंत्र बैठकीची व्यवस्था करण्यात आलेली आहे .

- कार्यालयामध्ये सुव्यवस्थित नामफलक व दिशादर्शक फलक लावण्यात आलेले आहेत.




# क्षेत्रीय कार्यालयांना भेटी

- विभागीय कार्यालयामार्फत, जिल्हास्तरीय कार्यालयांना वेळोवेळी भेटी देण्यात (Field Visits) येतात व कामकाजाचा आढावा घेण्यात येतो.
- केंद्र आणि राज्य शासनाच्या महत्वाच्या कार्यक्रम/प्रकल्पांना भेटी देऊन अंमलबजावणी व पर्यवेक्षण करण्यात येते.
- क्षेत्रीय भेटी दरम्यान ITI, बँक , उमेद ,माविम यांच्या कार्यालयांना तसेच MCED आणि MITCON यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमांना भेटी देण्यात येतात.
- कर्मचाऱ्यांचे अनुभव अडचणी व सूचना यावर त्वरित कार्यवाही करण्यात येते.







**कार्यालय :- महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,**
**प्रशासकीय इमारत, तळ मजला, राष्ट्रीय महामार्ग क्र.६, भंडारा.**

इमेल didic.bhandara@maharashtra.gov.in    दु.क्र. (०७१८४) २५१५८२

क्र.जिउकेभं/आस्था ग.म. पराते/2024-25/ 168    दिनांक :- 01/09/2025

संदर्भ:- 1. मुख्यालयाचे आदेश क्र.उसं/आस्था/नियुक्ती/अ.ज./संरक्षण/जी.एम.पराते/2015/बी-12734 दि. 01.12.2015
2. मुख्यालयाचे पत्र क्र.उसं/आस्था/नियुक्ती/अ.ज./संरक्षण/जी.एम.पराते/2024/सी-8011 दि. 22.08.2024
3. विभागीय कार्यालयाच पत्र क्र.उउसंना/आस्थापना/ग.मा. पराते/अ.ज.-विमाप्र/2024/2784 दि. 30.08.2024

-:: प्रस्तावना ::-

श्री ग. मा. पराते, व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, भंडारा हे दिनांक 31.07.2014 रोजी नियत वयोमानातुसार सेवानिवृत्त झाले असुन त्यांचे प्रकरणी संदर्भित शासन आदेश क्र. 1 चे अन्वये अ.ज. प्रवर्गाच्या अनुषंगाने देय करण्यात आलेले फायदे काढण्यात आलेले असुन त्यांच्या सेवेस दिनांक 15.06.1995 चे संरक्षण देण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने संचालनालयाचे संदर्भांकित आदेश क्र. 2 दिनांक 22.08.2024 अन्वये श्री ग.मा. पराते यांची सेवा जेष्ठता दिनांक 15.06.1995 रोजी उद्योग निरिक्षक (क.श्रे.) या पदावर निश्चित केलेली आहे. त्यामुळे दि. 15.06.1995 चे मुळ वेतन रू.1760/-संरक्षित करून, त्यानुसार पुढील वेतन निश्चिती क्रमप्राप्त ठरते. तरी या कार्यालयाचे अभिलेखानुसार खालील प्रमाणे सुधारित आदेश काढण्यात येत आहे.

-: सुधारीत आदेश :-

दिनांक 15.06.1995 -------------मुळ वेतन रु. 1760/-

पाचव्या वेतन आयोगानुसार उद्योग निरिक्षक (क.श्रे.) पदास अनुज्ञेय वेतन श्रेणीस रू. 1400-40-1800 द.रो. 50-2300मध्ये मुळ वेतन खालील प्रमाणे आहे.

दिनांक 15.06.1995 -------मुळ वेतन रु.1760/-

पाचव्या वेतन आयोगानुसार उद्योग निरिक्षक (क.श्रे.) पदास अनुज्ञेय वेतन श्रेणीस रू.5000-150-8000 मध्ये दि.01.01.96 रोजीची वेतन निश्चिती खालील प्रमाणे अनुज्ञेय करण्यात येत आहे.

(सेवा जेष्ठता निश्चित दि. 15.06.1995 मुळ वेतन रू. 1760/- वेतन श्रेणी रू. 5500 — 175 - 5000)

| | | | |
|---|---|---|---|
| दिनांक | 01.01.1996 | 5450/- | |
| दिनांक | 01.12.1996 | 5600/- | |
| दिनांक | 01.12.1997 | 5750/- | |
| दिनांक | 01.12.1998 | 5900/- | |
| दिनांक | 01.12.1999 | 6050/- | |
| दिनांक | 01.12.2000 | 6200/- | |
| दिनांक | 01.12.2001 | 6350/- | |
| दिनांक | 01-12-2002 | 6500/- | |
| दिनांक | 01.12.2003 | 6650/- | |
| दिनांक | 01.12.2004 | 6800/- | |

# ई -ऑफिस प्रणाली

- ई -ऑफिस कार्यप्रणालीचा वापर करण्यासंदर्भात राज्यस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
- ई ऑफिस प्रणाली कार्यान्वित झाल्यावर ४ किंवा त्यापेक्षा कमी स्तरावर मान्यता घेऊन प्रकरणांचा निपटारा करण्यात येईल.

# आर्थिक व औद्योगिक गुंतवणुकीस प्रोत्साहन

- उद्योजक/ गुंतवणूकदार वर्गाच्या संघटनांशी जिल्हा उद्योग मित्र समितीच्या माध्यमाने चर्चा करुन त्यांच्या अडचणी सोडविल्या जातात.
- तसेच विविध कार्यशाळा जसे कि IGNITE Maharshtra , Export Promotion Workshop, RAMP कार्यशाळा इ. द्वारे औद्योगिक / निर्यात वाढ होण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन केले जाते.
- उद्योग विभागामार्फत लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत एकूण ०३ सेवा अधिसूचित करुन ऑनलाईन पध्दतीने दिल्या जातात.
- या सेवा प्रदान करण्यासाठी पदनिर्देशित अधिकारी , अपिलीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली असून तसेच सेवेचा कालावधी निश्चित करण्यात आलेला असून या संदर्भातील फलक प्रदर्शित करण्यात आलेला आहे.
- मैत्री कायद्यांतर्गत विकास आयुक्त (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापित अधिकारप्रदत्त समितीमार्फत एक खिडकी प्रणाली अंतर्गत सक्षम प्राधिकारी यांचेकडे विहित कालमर्यादेपलीकडे प्रलंबित अर्जावर निकाली काढण्याची कार्यवाही करण्यात येते. याबाबत जिल्हा उद्योग केंद्रामार्फत उद्योजकांमध्ये विविध कार्यशाळांमधून जन जागृती करण्यात येते.



दिनांक ०९.०४.२०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी महोदयांचे अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा निर्यात प्रचलन समिती सभेचे इतिवृत्त.

जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा येथील सभागृहात सायं. ५.३० वाजता मा. जिल्हाधिकारी अध्यक्षतेखाली **जिल्हा निर्यात प्रचलन** समिती सभेचेआयोजन करण्यात आले होते. सदर सभेत खालील प्रमाणे अधिकारी व औद्योगीक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

1. मा. श्री. डॉ. संजय कोलते — जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा उद्योग मित्र समिती, भंडारा.
2. श्री. सुनिल रंभाड — अध्यक्ष, सहकारी औद्योगिक वसाहत, भंडारा.
3. श्री. पंकज सारडा — अध्यक्ष, मेटल मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन
4. श्री. हेमंत केशव बदर — महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव, जि.उ.के. भंडारा
5. श्री. गणेश तईकर — जिल्हा अग्रणी व्यवस्थापक, भंडारा
6. श्री किशोर पुसदकर — उप प्रादेशिक अधिकारी, MPCB
7. श्री अभय भागवत — उपाध्यक्ष, सहकारी औद्योगिक वसाहत, भंडारा.
8. श्रीमती आ. दे. वालदे — वरीष्ठ लिपिक, जिल्हा कौशल्य विभाग, भंडारा
9. श्री राकेश वाघाये — व्यवस्थापक, एच.आर. MMP IND LTD
10. श्री मृत्युंजय यादव — प्रतिनीधी, क्लॅरीऑन ऑर्गानिक लि.
11. श्री आर. एस. लाटेलवार — जिल्हा व्यवस्थापक, MSRLM, भंडारा
12. श्री डी. पाटील — जिल्हा व्यवस्थापक, उमेद, भंडारा
13. श्री सतिश श्रीवास्तव — एच.आर. हेड, SUNFLAG, भंडारा
14. श्री देवेन्द्र हेडाऊ — DDM NABARD, भंडारा.

सर्वप्रथम महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव, जि.उ.के. भंडारा यांनी सर्व उपस्थित सभासद / सदस्य / पदाधिकारी व अधिका-यांचे स्वागत केले व मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निर्यात प्रचलन समिती भंडारा यांचे परवानगीने सभेस सुरवात केली. अध्यक्षांनी खालिलप्रमाणे निर्देश

| अ क्र | चर्चेसाठी सादर विषय / मुद्दा | समिती सभेत अध्यक्षांनी दिलेले निर्देश | जबाबदार अधिकारी | अनुपालन पूर्ण करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | G. I. Tag मानांकनाबाबत FPO/शेतकरी जनजागृती | कृषि विभागाचे G.I. TAG मानांकन विषयी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यास कृषि विभागास सांगण्यात आले होते परंतू कृषि विभागाचे प्रतिनिधी अनुपस्थित असल्याने सदर विषयावर चर्चा होऊ शकली नाही. | कृषि अधिकारी / प्रकल्प संचालक, आत्मा | 1 महीना |
| 2. | कोसा सिल्क साडी उत्पादक महिला बचतगट सदस्य यांचे निर्याती बाबत | DGFT ने केलेल्या सूचना प्रमाणे कोसा सिल्क साडी उत्पादक महिला बचतगट सदस्या जे निर्यातीस इच्छूक आहेत. मा. अध्यक्षांनी DGFT यांचे प्रतिनिधींना, कोसा सिल्क साडी उत्पादक महिला बचतगट सदस्यांना योग्य मार्गदर्शन करण्याच्या सूचना दिल्या. | DGFT | 1 महीना |

उपरोक्त प्रमाणे पुढील सभेत सर्व मुद्यांवर कार्यवाही करण्याचे सुचनांसह उपस्थित राहण्याचे निर्देश अध्यक्ष महोदयांनी दिले. यानंतर सर्वांचे आभार मानुन सदस्य सचिव तथा महाव्यवस्थापक यांनी अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

मा. जिल्हाधिकारी तथा
अध्यक्ष जिल्हा निर्यात प्रचलन समिती, जिल्हा भंडारा

सदस्य सचिव तथा महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, भंडारा

दिनांक ०९.०४.२०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी, भंडारा यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा उद्योग मित्र समिती व स्थानिक लोकांना रोजगार समितीचे इतिवृत्त.

दिनांक ०९.०४.२०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी, भंडारा यांचे अध्यक्षतेखाली, जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा येथील सभागृहात सायंकाळी ०५.०० वाजता जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचेआयोजन करण्यात आले होते. सदर सभेत खालील प्रमाणे अधिकारी व औद्योगीक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

1. मा. श्री. डॉ. संजय कोलते — जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा उद्योग मित्र समिती, भंडारा.
2. श्री. सुनिल रंभाड — अध्यक्ष, सहकारी औद्योगिक वसाहत, भंडारा.
3. श्री. पंकज सारडा — अध्यक्ष, मेटल मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन
4. श्री. हेमंत केशव बदर — महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव, जि.उ.के. भंडारा
5. श्री. गणेश तईकर — जिल्हा अग्रणी व्यवस्थापक, भंडारा
6. श्री किशोर पुसदकर — उप प्रादेशिक अधिकारी, MPCB
7. श्री अभय भागवत — उपाध्यक्ष, सहकारी औद्योगिक वसाहत, भंडारा.
8. श्रीमती आ. दे. वालदे — वरीष्ठ लिपिक, जिल्हा कौशल्य विभाग, भंडारा
9. श्री राकेश वाघाये — व्यवस्थापक, एच.आर. MMP IND LTD
10. श्री मृत्युंजय यादव — प्रतिनीधी, क्लॅरीऑन ऑर्गानिक लि.
11. श्री आर. एस. लाटेलवार — जिल्हा व्यवस्थापक, MSRLM, भंडारा
12. श्री डी. पाटील — जिल्हा व्यवस्थापक, उमेद, भंडारा
13. श्री सतिश श्रीवास्तव — एच.आर. हेड, SUNFLAG, भंडारा
14. श्री देवेन्द्र हेडाऊ — DDM NABARD, भंडारा.

सर्वप्रथम महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव, जि.उ.के. भंडारा यांनी सर्व उपस्थित सभासद / सदस्य / पदाधिकारी व अधिका-यांचे स्वागत केले. मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा उद्योग मित्र समिती भंडारा यांचे परवानगीने सभेस सुरवात केली.

| अ. क्र. | चर्चेसाठी सादर विषय / मुद्दा | समिती सभेत अध्यक्षांनी दिलेले निर्देश | जबाबदार अधिकारी | अनुपालन पूर्ण करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1. | अशोका ले-लँड लि. गडेगाव, भंडारा यांचे १. कंसेट टू ऑपरेट करीता MPCB कडे प्रलंबित अर्ज. | उपप्रादेशिक अधिकारी MPCB यांनी सदर अर्ज मुख्य कार्यालय, मुंबई स्तरावर प्रलंबित असल्याचे सांगितले. मा. अध्यक्षांनी सदर प्रकरणाचा पाठपुरावा करण्याच्या सुचना केल्या. | उपविभागीय अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, भंडारा | 15 दिवस |
| 2. | ब्रास समुह करिता अतिरिक्त MIDC प्रस्ताव | MIDC चे एरीया मॅनेजर यांनी अतिरिक्त MIDC चा प्रस्ताव मुंबई कार्यालयास सादर केल्याचे सांगितले. तसेच सदर प्रस्ताव ज्या मौजा खरबी /खराडी भागातील आहे तेथील गावक-यांनी जमीन देण्यास विरोध दर्शविल्याचे सांगितले. श्री पंकज सारडा, अध्यक्ष मेटल मॅन्यु असो. यांनी पितळी उद्योग घटकांकरीता मागील ब-याच वर्षापासून जागेची मागणीह असल्याचे सांगितयले. मा. अध्यक्षांनी अतिरिक्त MIDC करीता पर्यायी जागा शोधण्याचे निर्देश दिले. | विभागीय अधिकारी MIDC | 1 महिना |
| 3. | मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना | कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे शासन निर्णयानुसार मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत ६ महिन्यांकरीता प्रशिक्षणार्थींना आणखी ५ महीने कार्यमुदतवाढ देण्याची शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश मा. अध्यक्षांनी उपस्थित उद्योजक व उद्योग संघटनांना केले. यावर जिल्हा कौशल्य विभागाचे प्रतिनीधींनी कार्यवाही सुरू असल्याचे सांगितले | उद्योग संघटना/ जिल्हा कौशल्य विभाग | 15 दिवस |
| 4. | औद्योगिक सहकारी वसाहतीतील रस्ते व नाल्यांच्या समस्येबाबत. | श्री अभय भागवत, उपाध्यक्ष, सहकारी औद्योगिक वसाहत, भंडारा. यांनी औद्योगिक सहकारी वसाहतीतील रस्ते व नाल्यांची समस्या ब-याच वर्षापासून असल्याचे सांगितले त्यावर मा. अध्यक्षांनी त्यांचे दूरूस्तीबाबत प्रस्ताव नियोजन विभागाकडे सादर करण्याची सुचना केली. | औद्योगिक सहकारी वसाहत, भंडारा. | 1 महीना |
| 5 | औद्योगिक सहकारी वसाहतीतील भुखंड अधिमुल्य भरून व्यापारी प्रयोजनाकरिता वापरण्याबाबत.. | श्री अभय भागवत, उपाध्यक्ष, सहकारी औद्योगिक वसाहत, भंडारा. यांनी औद्योगिक सहकारी वसाहतीतील भुखंड अधिमुल्य भरून व्यापारी प्रयोजनाकरिता वापरण्याबाबत शासन निर्णयात तरतूद असल्याबाबत सांगितले, मा. अध्यक्षांनी सदर शासन निर्णय सादर करण्यास सांगितले. | औद्योगिक सहकारी वसाहत, भंडारा. | 1 महीना |

या सभेनंतर स्थानिक लोकांना रोगार सभेचा आढावा घेण्यात आला व तो शासकीय निकषाप्रमाणे पर्यवक्षकीय 50% व पर्यवेक्षीय सहीत एकूण स्थानिक रोजगार 80% पेक्षा अधिक आहे. शेवटी सदस्य सचिव तथा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, भंडारा यांनी सर्वांचे आभार मानून अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

सदस्य सचिव तथा महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, भंडारा

मा. जिल्हाधिकारी तथा
अध्यक्ष जिल्हा उद्योग मित्र समिती, जिल्हा भंडारा

- अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण आणि AI तंत्रज्ञान वापर

राज्य प्रशिक्षण धोरण अंतर्गत कु. चक्षूमती अढाऊ यांचं, उद्योग निरीक्षक, गट क संवर्गातील कर्मचाऱ्यांचे सांगली येथे १२ दिवसीय पायाभूत प्रशिक्षण केले.

NIMSME, हैदराबाद येथे महाव्यवस्थापक तसेच व्यवस्थापक यांचे ५ दिवशीय प्रशिक्षण झाले

यशदा, पुणे येथे व्यवस्थापक कुणाल गोंडचवर यांनी AI संदर्भात प्रशिक्षण घेतले.

निवृत्त महाव्यवस्थापक पराते यांचे वेतन निच्छिती संदर्भातील तक्रारींचे निराकान करण्यात आले.


CMEGP योजना राबवितांना तसेच त्यासंदर्भात रिपोर्ट तयार करतांना AI तंत्रज्ञान वापर करण्यात आला.











कार्यालय :- महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,
प्रशासकीय इमारत, तळ मजला, राष्ट्रीय महामार्ग क्र.६, भंडारा.

इमेल didic.bhandara@maharashtra.gov.in दु.क्र. (०७१८४) २५१५८२

क्र.जिउकेभं/आस्था ग.म. पराते/2024-25/ 168 दिनांक :- 01/04/2025

संदर्भ:- 1. मुख्यालयाचे आदेश क्र.उसं/आस्था/नियुक्ती/अ.ज./संरक्षण/जी.एम.पराते/2015/बी-12734 दि. 01.12.2015
2. मुख्यालयाचे पत्र क्र.उसं/आस्था/नियुक्ती/अ.ज./संरक्षण/जी.एम.पराते/2024/सी-8011 दि. 22.08.2024
3. विभागीय कार्यालयाच पत्र क्र.उउसंना/आस्थापना/ग.मा. पराते/अ.ज.-विमाप्र/2024/2784 दि. 30.08.2024

-:: प्रस्तावना ::-

श्री ग. मा. पराते, व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, भंडारा हे दिनांक 31.07.2014 रोजी नियत वयोमानातुसार सेवानिवृत्त झाले असुन त्यांचे प्रकरणी संदर्भित शासन आदेश क्र. 1 चे अन्वये अ.ज. प्रवर्गाच्या अनुषंगाने देय करण्यात आलेले फायदे काढण्यात आलेले असुन त्यांच्या सेवेस दिनांक 15.06.1995 चे संरक्षण देण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने संचालनालयाचे संदर्भांकित आदेश क्र. 2 दिनांक 22.08.2024 अन्वये श्री ग.मा. पराते यांची सेवा जेष्ठता दिनांक 15.06.1995 रोजी उद्योग निरिक्षक (क.श्रे.) या पदावर निश्चित केलेली आहे. त्यामुळे दि. 15.06.1995 चे मुळ वेतन रू.1760/-संरक्षित करून, त्यानुसार पुढील वेतन निश्चिती क्रमप्राप्त ठरते. तरी या कार्यालयाचे अभिलेखानुसार खालील प्रमाणे सुधारित आदेश काढण्यात येत आहे.

-: सुधारीत आदेश :-

दिनांक 15.06.1995 -------------मुळ वेतन रु. 1760/-

पाचव्या वेतन आयोगानुसार उद्योग निरिक्षक (क.श्रे.) पदास अनुज्ञेय वेतन श्रेणीस रू. 1400-40-1800 द.रो. 50-2300मध्ये मुळ वेतन खालील प्रमाणे आहे.

दिनांक 15.06.1995 -------मुळ वेतन रु.1760/-

पाचव्या वेतन आयोगानुसार उद्योग निरिक्षक (क.श्रे.) पदास अनुज्ञेय वेतन श्रेणीस रू.5000-150-8000 मध्ये दि.01.01.96 रोजीची वेतन निश्चिती खालील प्रमाणे अनुज्ञेय करण्यात येत आहे.

(सेवा जेष्ठता निश्चित दि. 15.06.1995 मुळ वेतन रू. 1760/- वेतन श्रेणी रू. 5500 — 175 - 5000)

| | | | |
|---|---|---|---|
| दिनांक | 01.01.1996 | 5450/- | |
| दिनांक | 01.12.1996 | 5600/- | |
| दिनांक | 01.12.1997 | 5750/- | |
| दिनांक | 01.12.1998 | 5900/- | |
| दिनांक | 01.12.1999 | 6050/- | |
| दिनांक | 01.12.2000 | 6200/- | |
| दिनांक | 01.12.2001 | 6350/- | |
| दिनांक | 01-12-2002 | 6500/- | |
| दिनांक | 01.12.2003 | 6650/- | |
| दिनांक | 01.12.2004 | 6800/- | |

# नावीन्यपूर्ण उपक्रम

- भंडारा जिल्ह्यातील निर्यात वाढावी तसेच निर्यात करतांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण व्हावे यासाठी जिल्हा निर्यात प्रसिद्धी कशा स्थापन करण्यात आला आहे.
- भंडारा जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळावर महाराष्ट्रातील जिल्हावार निर्यातीची माहिती दर्शविणा-या मैत्री निर्यात  डॅशबोर्डची लिंक देण्यात आली आहे.



# धन्यवाद